
<u>प्रकरण २ रे</u>

# संबंधित साहित्याचा

# आढावा

## दृष्टीक्षेपात प्रकरण दुसरे

## ग्रंथालय, संदर्भसाहित्यासाठी भेटी दिलेली स्थळे



# प्रकरण २

# संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा

## २.१ प्रस्तावना :

पहिल्या प्रकरणामध्ये संशोधिकेने प्रस्तावना, समस्येची गरज व महत्व, समस्या विधान, पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, व्याप्ती व मर्यादा प्रकरण योजना याविषयी माहिती दिली आहे.

प्रस्तुत प्रकरणात संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा घेतला आहे.

प्रकरणाची मांडणी दोन भागात केली आहे.

अ) संबंधित साहित्याचा आढावा.

ब) संबंधित संशोधनाचा आढावा.

संशोधकाने आपला विषय ज्या संशोधन क्षेत्रात येतो. त्या संशोधन क्षेत्रातील पूर्वी झालेल्या साहित्याचा व संशोधनाचा मागोवा घेणे आवश्यक असते. पूर्वीच्या संशोधनाचे क्षेत्र कोणते? साधने कोणती? माहिती व तिचे विशदीकरण, निष्कर्ष सूचना कोणत्या? याची दखल घेऊन त्याच गोष्टींची निश्चिती करावयाची असते. त्यासाठी पूर्वीच्या अहवालातील आवश्यक बाबी संशोधकाने आपल्या अहवालात सादर करणे जरूरीचे असते. संशोधकाने माहिती उद्धृत करताना तिचा आधार स्पष्ट केला पाहिजे.

संबंधित संशोधनाचे महत्व सांगताना गुडबार आणि स्केटस् म्हणतात.

"The competent physician must keep a breast of the latest discoveries in the field of medicine, obviously the careful student of education, the research workers and the investigator should become familiar with the location and use of sources of educational information."

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधिकेने संशोधन समस्येशी संबंधित साहित्याचे समालोचन केले आहे.

संबंधित साहित्याच्या समालोचनाचे महत्व :

१. संशोधनाची अनावश्यक पुनरावृत्ती होत असेल तर ती टाळता येते.

२. संशोधकाचे ज्ञान वाढीस लागते, संशोधनाची कार्यपद्धती समजते. संशोधन कौशल्य लक्षात येते.

३. संशोधकाला त्याने निवडलेल्या संशोधन क्षेत्रात आजपर्यंत झालेल्या संशोधनाची माहिती मिळते.

४. संशोधन समस्येची निवड करण्यात उपयोगी आहे. निवडलेल्या समस्येचे विश्लेषण व समस्या कथन करताना मार्गदर्शन होते.

५. संशाधनाची मर्यादा ठरविणे सोपे जाते, पदांच्या व्याख्या करणे सोपे जाते.

६. संशोधकास सदैव निश्चित मार्गाने जाण्याची सूचना करते.

७. श्रम व वेळेची बचत होते. संशोधकाचा आत्मविश्वास वाढीस लागतो.

८. संशोधकास आपल्या संशोधनासाठी उपयुक्त साधने सुचतात.

९. संशोधकास संशोधनाचा आराखडा तयार करण्यासाठी उपयुक्त आहे.

१०. संशोधकास आपल्या संशाधनाची गृहितकृत्ये करण्यास मदत होते.

११. संख्याशास्त्रीय साधनांचा उपयोग समजतो.

१२. संशोधनातील माहितीला आधार देता येतात.

१३. संबंधित साहित्यातील योग्य उत्तरे, सारांश, मध्यवर्ती कल्पना आपल्या संशोधन अहवालात दिल्या की परीक्षकासही आपण केलेल्या अभ्यासाची कल्पना येते.

प्रस्तुत संशोधन समस्येशी संबंधित साहित्याचे समालोचन करणे महत्वाचे आहे. त्यामुळे संशोधन पद्धती आणि संशोधनाचे तंत्र याबद्दल निश्चित कल्पना येते.

या संबंधी 'Whitney' आपल्या 'The Elements of Research' या ग्रंथात म्हणतो –

"The student should find analyse and evaluate critically every pertient search report dealing with his chosen problem. Anything less than this will be neither sensible nor scientific".

The review of the literature promotes a greater understanding of the problem and its crucial aspects and ensures the avoidance at necessary duplication. It also provides comparative data on the basis of which to evaluate and interprets the significance of one's findings. N addition it contributes to the scholarship of the investigator. No experienced researcher, would think or undertaking a study without acquainting himself with the contribution of previous investigators".

संबंधित साहित्याच्या समालोचनाची उद्दिष्टे :

१) निवडलेल्या विषयासंबंधी पूर्ण झालेल्या संशोधनाची कल्पना प्राप्त करून त्याची पुनरावृत्ती टाळणे व योग्य संशोधन विषय निवडण्यास योग्य मार्गदर्शन मिळविणे.

२) संशोधन विषयासंबंधी सिद्धांत व गृहितकृत्ये यांच्या मांडणीबद्दल निश्चित कल्पना प्राप्त करून घेणे.


३) आधारसामुग्री व निष्कर्ष या विषयी तुलनात्मक माहिती मिळविणे समर्पक सांख्यिकी तंत्र व त्याचा उपयोग

## अ) संबंधित साहित्याचा आढावा :

'आशययुक्त अध्यापन पध्दती' या संदर्भ पुस्तकात सरपोतदार पी.ए., भोसले ए.व्ही. यांनी अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकासंदर्भात पुढील विचार मांडले आहेत.

### अभ्यासक्रमाचे घटक :

१) उद्दिष्टे २) आशय ३) शैक्षणिक अनुभव ४) मूल्यमापन हे चारही घटक परस्परांशी निगडीत असतात.




### १. उद्दिष्टे :

अभ्यासक्रम हा उद्दिष्टांवर आधारलेला असतो. उद्दिष्टे अभ्यासक्रमामध्ये स्पष्टपणे नमूद केलेली असतात. शिक्षणातून काय साध्य करायचे आहे हे उद्दिष्टातून कळते.

### २. आशय :

उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी विशिष्ट क्षेत्रे निवडली जातात.

उदा. १) भाषा २) गणित ३) समाजोपयोगी उत्पादक कार्य ५) कला ६) सर्जनशील उपक्रम ७) परिसर अभ्यास

सर्व मूलांसाठी किमान व समान क्षमतांच्या स्वरूपावर आशय आधारित असतो. आशय अर्थपूर्ण व वर्तमान सामाजिक गरजांशी सुसंबद्ध व

विद्यार्थ्यांच्या अभिरूचीला अनुरूप असतो. काय शिकवावे? (या प्रश्नाचे उत्तर आपल्याला आशय देतो)

३. शैक्षणिक अनुभव :

शाळा, विद्यार्थी व समाज यांच्या गरजेनुसार बदलता येतात, कसे शिकवावे (अध्यापन पद्धती) हे ठरवावे लागते.

४.मूल्यमापन :

उद्दिष्टे, आशय, शैक्षणिक अनुभव, पाठ्यपुस्तके, अध्ययन, अध्यापन, साहित्य व विद्यार्थ्यांची प्रगती यांचे मूल्यमापन होते. मूल्यमापनामुळे सर्व बाबींमधील गुणदोष कळतात. त्यात सुधारणा करता येते. म्हणजेच काय साध्य झाले या प्रश्नाचे उत्तर मूल्यमापनात मिळते.

अभ्यासक्रम एक साधन :

शिक्षणाची सर्वसामान्य उद्दिष्टे निश्चित केलेली असतात. या उद्दिष्टांची पूर्ती व्यक्तीच्या व समाजाच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाची असते. या सर्वसामान्य उद्दिष्टांना अनुसरून पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्टे निर्धारीत केलेली असतात. ती राष्ट्राच्या गरजा व आकांक्षा यांना सुसंगत असतात. ही उद्दिष्टे ठरविताना तत्वज्ञान समाजशास्त्र व मानसशास्त्र यांचा उपयोग केला जातो. ही उद्दिष्टे पूर्ण करणे हे प्रत्येक शिक्षकाचे कर्तव्य असते. ही उद्दिष्टे पूर्ण करण्याचे एक महत्वाचे साधन म्हणजे अभ्यासक्रम होय.

अभ्यासक्रमात प्रत्येक स्तराला व बालकाच्या विकासावस्थेला अनुरूप अशा विषयांचा अंतर्भाव केलेला असतो. विषयाचे घटक—उपघटक दिलेले असतात. अनेक शैक्षणिक अनुभव व कृतींचा समावेश असतो. या अनुभव

योजनेतून मूल्ये, कौशल्ये व अभिवृत्ती विकसित केल्या जातात. विषय कोणताही असो, घटक कोणताही असो, त्यातून विद्यार्थ्याला ज्ञान दिले जाते. त्याच्या विचारशक्तींचा विकास केला जातो व कार्यकौशल्ये ही विकसित केले जाते. उपजत क्षमतांचा विकास करण्यासाठी विविध उपक्रमांचा उपयोग केला जातो.

$$\text{क्षमता} \quad \div \quad \frac{\text{विकासासाठी आवश्यक}}{\text{उपक्रमांची मांडणी}} = \text{अभ्यासक्रम}$$

म्हणून अभ्यासक्रम हे विद्यार्थ्यांच्या भावनात्मक, भाषिक व बौध्दिक विकासासाठी जाणीवपूर्वक तयार केलेले साधन आहे.

उदा : शिक्षणाचा एक महत्वाचा उद्देश –

विद्यार्थ्यांचे भाषिक सामर्थ्य वाढविणे यासाठी श्रवण, भाषण, वाचन, लेखन या भाषिक कौशल्यांचा विकास होतो. व याचदृष्टीने मातृभाषा हिंदी, इंग्रजी, या भाषांना अभ्यासक्रमात स्थान दिले आहे.

या सर्व विषय व कृतींमधून एकसंघ अभ्यासक्रम बनतो. हा अभ्यासक्रम उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी साधन म्हणूनच कार्यवाहीत आणला जातो.

## अभ्यासक्रमाची क्रमबध्दता :

कोणता विषय आधी शिकवायचा व कोणता नंतर, केव्हा शिकवायचा हे निश्चित करावे लागते. हे ठरविताना विद्यार्थ्यांचा विकासस्तर लक्षात घ्यावा लागतो. तसेच प्रत्येक विषयातील घटकांचाही क्रम लावणे आवश्यक असते. त्याच्या कुवतीला अनुसरून विषयांच्या क्रम लावावा लागतो. घटनांचा क्रम लावताना विषयांचे स्वरूप, विद्यार्थ्यांची आकलनशक्ती व अनुभवसामर्थ्य यांचा विचार करणे आवश्यक असते.

## अभ्यासक्रमाची आवश्यकता आणि महत्व :

प्रत्येक विषयाचे क्षेत्र विस्तृत असते. त्यामुळे कोणत्या इयत्तेत काय शिकायचे यासाठी विद्यार्थ्यांचा वयोगट लक्षात घ्यावा लागतो. शाळेत कोणताही विषय शिकविताना दैनंदिन जीवनाला उपयुक्त ज्ञान देणे आणि जीवनासाठी आवश्यक असणारा पाया तयार करणे या महत्वाच्या गोष्टी असतात. प्राथमिक व माध्यमिक स्तर हे शिक्षणाचे मूलभूत स्तर असून प्राथमिक शिक्षणातून विद्यार्थी माध्यमिक स्तरामध्ये जातो. तो पूर्ण केल्यावर तो उच्च शिक्षणाकडे जात असतो. परंतु उच्च शिक्षणाकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण बरेच कमी असते. परंतु राष्ट्रीय हितासाठी हे प्रमाण उंचावणे आवश्यक आहे.

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात क्षमता व मूल्ये यांच्या विकासावर भर देण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रत्येक विषयातून कोणत्या क्षमतांचा विकास करावयाचा आहे याचाही विचार करावा लागतो. साधारणपणे चौकसपणा, सृजनशीलता, वस्तुनिष्ठता, संवेदनक्षमता, सौंदर्याभिरूची इ. क्षमतांचा विकास केला जातो.

समस्यानिराकरण, निर्णयक्षमता या बाबींचाही विचार अभ्यासक्रम तयार करताना केला पाहिजे. तरच अभ्यासक्रम जास्तीतजास्त उपयुक्त होऊ शकेल.

## पाठ्यपुस्तक तयार करताना उपयोगात आणावयाची मागदर्शक तत्वे :

१) पाठ्यपुस्तक घटकांचा आशय उद्‌दिष्टांपर्यंत पोहोचवणारा असावा.

२) पाठ्यपुस्तकातील घटक अभ्यासक्रमाची पूर्ती करणारे असावेत.

३) पाठ्यपुस्तक पाठ्यक्रमावरून तयार केले जावे.

४) पाठ्यपुस्तकातील आशय मानसशास्त्रीय दृष्टीने निवडला जावा.

५) पाठ्यपुस्तकातील आशय विद्यार्थ्यांच्या जीवनव्यवहाराशी संबंधित व पूर्वज्ञानावर आधारलेला असावा.

६) व्यक्तिविकासास पोषक असाच आशय पाठ्यपुस्तकात निवडला जावा.

७) पाठ्यपुस्तकातील घटकांचा क्रम योग्य हवा.

८) पाठ्यपुस्तक स्वाध्याय इ. नोंद गरजेची.

## चांगल्या पुस्तकाचे निकष :

कोणत्याही पाठ्यपुस्तकाचे परीक्षण करताना ते दोन भागात करावे लागते.

१) पाठ्यपुस्तकाचे बहिरंग

२) पाठ्यपुस्तकाचे अंतरंग

## १) पाठ्यपुस्तकाचे बहिरंग :

### १. लेखक (संपादकीय मंडळ) :

ज्या विषयाचे पाठ्यपुस्तक लिहायचे आहे, ते लिहिणाऱ्या संपादकीय मंडळाचा शिकविण्याचा भरपूर अनुभव असावा. याचा अर्थ किमान पाच वर्षापेक्षा जास्त अध्यापनाचे कार्य झालेले असावे. कारण त्यामुळे त्याला अध्ययन–अध्यापन पद्धतीची माहिती झालेली असते व त्याला काही अनुभव मिळालेले असतात. त्या अनुभवांचा उपयोग ते पाठ्यपुस्तक लिहिण्यासाठी करू शकतात.

### २. तांत्रिक बाबी :

यामध्ये पाठ्यपुस्तकाचा कागद, छपाई, पुस्तकबांधणी व पुस्तकाचा आकार या मुद्दयांचा विचार केला जातो.

i) पाठ्यपुस्तकाचा कागद :

कागदाची प्रत विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून चिवट असली पाहिजे. विद्यार्थ्यांकडून कागद सहजासहजी फाटता उपयोगी नाही.

ii) पाठ्यपुस्तकाची छपाई :

विद्यार्थ्यांचा वयोगट विचारात घेऊन पुस्तकाची छपाई केलेली असावी.

अ) प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची वाचनक्षमता फारशी विकसित नसते. त्यामुळे त्यांच्यासाठी अक्षरांचा आकार मोठा असावा.

ब) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यासाठी अक्षराचा मोठा आकार परंतु त्यांना सहजासहजी वाचता येईल एवढा मोठा असावा.

३. पुस्तकबांधणी :

पुस्तकाची बांधणी मजबूत टिकाऊ स्वरूपाची असावी. जेणेकरून विद्यार्थ्यांना ते हाताळण्यास सोपे जावे.

साधारणपणे पुस्तकबांधणीचे प्रकार खालीलप्रमाणे पडतात.

पुस्तक बांधणीचे प्रकार

१) साधी बांधणी
↓
फक्त डिंकाने चिकटवलेले असते
↓
टिकाऊपणा कमी
↓
खर्च कमी
↓
किंमत कमी
↓
सर्व विद्यार्थ्यांना परवडणारी

२) शिलाई बांधणी
↓
ऑफिसमध्ये फाईलला, पुस्तकांना शिलाई केलेली असते.
↓
टिकाऊ व खर्च कमी
↓
किंमत कमी
↓
सर्व विद्यार्थ्यांना परवडणारी

३) कापडी बांधणी
↓
ऑफिसमध्ये फाईलप्रमाणे याला कापडी बांधणी करतात.
↓
टिकाऊ व खर्चिक
↓
किंमत जास्त
↓
सर्वसाधारण विद्यार्थ्यांना न परवडणारी

४. पुस्तकाचा आकार :

विद्यार्थ्यांना दप्तरातून पुस्तक सहजासहजी नेता यावे असा पुस्तकाचा आकार असावा.

पुस्तकाचा आकार मध्यम (Medium size) असावा. कारण भूगोलाची पुस्तके मोठ्या (Full size) आकाराची असतात. ती दप्तरामध्ये नीट बसत नाहीत, लवकर फाटतात. त्यामुळे पुस्तकाचा आकार मध्यम असावा.

५. पाठ्यपुस्तकाची किंमत :

प्रत्येक स्तरातील विद्यार्थ्याला परवडेल अशी किंमत असावी.

६. मुखपृष्ठ :

आकर्षक, लहान वर्गासाठी चित्रे, आकृत्या वगैरे असलेले असावे. विद्यार्थ्यांचे लक्षकेंद्रीत करून घेणारे असावे.

७. मलपृष्ठ :

पुस्तकाचे मागील पानावर पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळाचे नाव, एखादे चिन्ह असावे भडक रंगसंगती नसावी. फिक्या रंगांची रंगसंगती योग्यपणे साधलेली असावी.

## २) पाठ्यपुस्तकाचे अंतरंग :

खालील मुद्दयांचा विचार करून पाठ्यपुस्तकाचे अंतरंग बघितले जावे. कारण अंतरंग हा त्या पाठ्यपुस्तकाचा महत्वाचा भाग असतो.

१. पाठ्यक्रमानुसार पाठ्यपुस्तक असावे.

२. उद्दिष्टानुसार पाठ्यपुस्तकाची मांडणी.

३. घटक मांडणीतील सुसंगतता.

४. घटकाच्या मांडणीतील सूत्रांचा – तत्वांचा उपयोग.

५. आशयातील अचूकता व रचनेतील सुसंगतता.

६. पुरेशी नमुना उदाहरणे.

७. योग्य चित्रे, आकृत्या, नकाशे इ.

८. स्वाध्याय संदर्भ

९. प्रयोग

१०. गाभाभूत घटकांचा सखोल विचार

११. भाषा साधी व सोपी असावी.

१२. शैक्षणिक साधनांचा उल्लेख असावा.

## भाषेच्या चांगल्या पाठ्यपुस्तकाची लक्षणे/ पाठ्यपुस्तकाचे चिकित्सक परीक्षण :

पाठ्यपुस्तक हे अध्ययन–अध्यापनाचे अनिवार्य साधन असल्यामुळे भाषा विषयात पाठ्यपुस्तकाला अनन्यसाधारण महत्व आहे. पाठ्यपुस्तक हातात पडल्याबरोबर विद्यार्थ्यांचे लक्ष त्याच्या बाह्यरंगाकडे प्रथम जाते. पण त्याचबरोबर अंतरंगही तेवढेच महत्वाचे असते.

१. वेच्यांची निवड

२. वेच्यांचे संपादन

३. वेच्यांचा परिचय

४. शब्दार्थ–संदर्भ व टिपा

५. प्रश्न–स्वाध्याय–उपक्रम

६. भाषाभ्यास, शुध्दलेखन, वाचन, लेखन

७. व्याकरण

८. पाठ्यपुस्तकातील लेखनशुध्दता

## पाठ्यपुस्तकाचे उपयोग :

हॉल क्वेस्टच्या मते ज्ञान मिळविण्याचे साधन, मार्गदर्शक साहित्य, सत्याचा अर्थ लावणारे माध्यम, विद्यार्थ्यांना स्फूर्ती देणारे असे पुस्तकाचे पाच उपयोग आहेत. तसेच इतरही पाठ्यपुस्तकाचे खालीलप्रमाणे उपयोग आहेत.

१. विषयमांडणी उद्दिष्टे, कार्यक्रम समजण्यास मदत होते.

२. मूलभूत ज्ञान मिळते.

३. अभ्यासक्रमाची उद्दिष्टे कार्यक्रम समजण्यास मदत होते.

४. शाळेतील त्या–त्या कामात एकवाक्यता आणण्यासाठी उपयुक्त

५. विद्यार्थ्यांत शास्त्रीय दृष्टीकोन निर्माण करण्यास उपयुक्त.

६. शास्त्रीय तत्वे समजण्यास मदत होते.

७. कौशल्यावर भर असल्याने कौशल्य विकसित करण्याचे मागदर्शन मिळते.

८. वर्गात शिकवलेल्या भागांची उजळणी करण्यासाठी उपयुक्त.

## विभाग ब) संबंधित संशोधनाचा आढावा :

I मराठी पुस्तकाशी संबंधित संशोधने :

१) सौ. मनिषा सुभाष जाधव (१९९७), पुणे

विषय : "बालभारती मराठी इ.६वी (१९९४) या पाठ्यपुस्तकाचे संशोधनात्मक समीक्षण".

उद्दिष्टे :

१) सहावी मराठी बालभारतीचे समीक्षण करणे.

२) पाठ्यपुस्तकाच्या बाह्यस्वरूपाचा अभ्यास करणे.

३) पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगाचा अभ्यास करणे.

४) पाठ्यपुस्तकातील आशय अभ्यासक्रमाच्या उद्देशांशी अनुरूप आहेत का? अभ्यासणे.

निष्कर्ष :

१) पाठ्यपुस्तकातील पाठ्यांश अभ्यासक्रमातील उद्दिष्टांप्रमाणे आहेत.

२) गाभाघटकांवर भर आहे.

३) स्वाध्यायात अधिक वस्तुनिष्ठ प्रश्न हवेत. पाठांतर प्रवृत्ती विकसित होण्यासाठी प्रश्न हवेत.

४) चित्रे समाधानकारक आहेत.

२) राजेंद्र कृष्ण कदम (१९९७), पुणे

विषय : बालभारती इ.७वी मराठी (१९९५) पाठ्यपुस्तकाचे समीक्षण

उद्दिष्टे :

१) दहा गाभा घटकांची जाणीव निर्माण करणारा आशय शोधणे.

२) पाठ्यपुस्तकातील चित्रे, उतारे, स्वाध्याय, उपक्रम इ. चा चिकित्सक अभ्यास करणे.

३) पाठ्यपुस्तकातील व्याकरणाचा भाग संबंधित पाठ्यांशाच्या अनुषंगाने देण्यात आला आहे का? हे शोधून काढणे.

४) पाठ्यपुस्तकाची छपाई उत्कृष्ट आहे.

५) पाठ्यपुस्तकाची भाषाशैली उद्दिष्टांशी सुसंगत आहे.

३) शिवाजी बलदेवगीर बुवा (१९९९–२०००), पुणे

विषय :''मातृभाषा मराठी इ.५वीचे कार्यात्मक व्याकरण व भाषेचा व्यवहारातील उपयोग'' या कार्यक्षेत्राच्या दृष्टीकोनातून समीक्षण.

उद्दिष्टे :

१) मराठी बालभारती इ.५वीचे 'कार्यात्मक व्याकरण' या क्षेत्राचे समीक्षण करणे.

२) भाषेचा व्यवहारातील उपयोग या क्षेत्राच्या क्षमतेचे मूल्यमापन करणे.

३) पाठ्यपुस्तकातील उपक्रमाव्दारे वरील दोन्ही क्षेत्रातील क्षमतांचा कितपत विकास होतो, याचा शोध घेणे.

निष्कर्ष :

१) पाठ्यपुस्तकातील 'कार्यात्मक व्याकरणाची' काठिण्यपातळी आकलनदृष्ट्या ग्रामीण/शहरी विभागानुसार वेगळी नाही. सर्वांना सारखीच आहे.

२) मराठी भाषा बोलताना सर्वाधिक चुका उच्चार, वाक्यरचना, अर्थ न समजता बोलणे याबाबतीत विद्यार्थ्यांच्या चुका होतात.

३) लिहिताना सर्वाधिक चुका ऱ्हस्व, दीर्घ, संयुक्तअक्षर, उद्गार चिन्ह, रफार, स्वल्पविराम याबाबतीत विद्यार्थ्यांच्या चुका होतात.

४) 'कार्यात्मक व्याकरण व भाषेचा व्यवहारात उपयोग या दोन्ही क्षेत्राच्या विकासासाठी मार्गदर्शनाची गरज आहे.

४) पाटील व्ही.एच. (१९९४), कोल्हापूर

विषय : 'इ.८वीच्या मराठी पाठ्यपुस्तकाचे पाठ्यपुस्तक तंत्रज्ञानानुसार पृथ:करण करणे.'

उद्दिष्टे :

१) पाठ्यपुस्तकाच्या बाह्यांगाचा अभ्यास करणे.

२) पाठ्यपुस्तक तंत्रज्ञानानुसार अंतरंगाचे विश्लेषण.

३) इ.८वीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील छापील मजकुराचे पृथ्थकरण करणे.

४) इ.८वीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील गणितीय स्वरूपाचा अभ्यास करणे.

५) इ.८वीच्या मराठी पाठ्यपुस्तकांचा वाचकांवर होणारा परिणाम अभ्यासणे.

६) इ.८वीच्या मराठी पाठ्यपुस्तकाचा नाविन्यपूर्ण उपयोग कसा करता येईल याचा शोध घेणे.

निष्कर्ष :

१) इ.८वीच्या मराठी पाठ्यपुस्तकाचा आकार हाताळण्यास योग्य आहे, पृष्ठसंख्या पुरेशी आहे.

२) बांधणी सैल, मुखपृष्ठ आकर्षक, किंमत योग्य, शीर्षक पान परिपूर्ण आहे.

३) पाठ्यपुस्तकातील अक्षरांतील ओळींची लांबी, टाईप, २ ओळी व २ शब्दांतील, परिच्छेदासाठी सोडलेले अंतर पुरेसे आहे.

४) छपाई कलात्मक नाही.

५) उद्दिष्टे साध्य करणारे पाठ आहेत.

६) आशय संघटन पुरेसे आहे.

## II हिंदी पाठ्यपुस्तकांशी संबंधित संशोधने :

### १) देवचके ज्योती प्रकाश (२००३–०४), पुणे

विषय :

'अभ्यासक्रमात सुधारणा करण्याचा दृष्टीने व्दितीयभाषा हिंदीसाठी असलेल्या इ.५वी हिंदी सुलभभारती पाठ्यपुस्तकाचे संशोधनात्मक समीक्षण'.

उद्दिष्टे :

इ.५वीच्या हिंदीच्या नवीन अभ्यासक्रमात बदल सुचविण्याचा दृष्टीने –

१) इ.५वीच्या विद्यार्थ्यांना भाषिक अनुमती देण्यासाठी अभ्यासक्रमाची समग्रता अभ्यासणे.

२) इ.५वीच्या हिंदी पाठ्यपुस्तकात अभ्यासक्रमाची उद्दिष्टे कितपत प्रतिबिंबीत झाली ते पाहणे.

३) १९८७ च्या शैक्षणिक धोरणास अनुसरून पाठ्यपुस्तकात १० गाभाघटकांचा समावेश आहे का ते अभ्यासणे.

४) पाठ्यक्रमात मूल्यशिक्षणाचा अंतर्भाव झाला आहे का हे तपासून विद्यार्थ्यांच्या भावनिक गरजांची पूर्तता होते का हे तपासणे.

निष्कर्ष :

१) श्रवण, वाचन, पाठांतर, लेखन, भाषण या क्षमतांचा विचार अत्यल्प आहे.

२) पाठ्यपुस्तकाची रचना १९९५च्या अभ्यासक्रमानुसार क्षमतांवरच आधारित हवी.

३) पाठामध्ये १० गाभाघटकांचा समावेश आहे. परंतु एकापेक्षा अधिक गाभाघटकांचा समावेश असणारे पाठ कमी आहेत.

४) एकाच पाठात एकापेक्षा जास्त गाभाघटक असणे चांगले आहे.

५) काही पाठांमधून मूल्यसंवर्धन होते. परंतु त्याही व्यतिरिक्त स्वच्छता, संयम, भूतदया, प्रामाणिकपणा इ. वयोगटानुसार आवश्यक असलेल्या मूल्यांचा विचार नाही.

६) पाठ्यपुस्तकाच्या बहिरंगाविषयी निष्कर्ष :

i) बांधणीमध्यम ii) अक्षर रेखाटन न्यूनतम iii) मुखपृष्ठ आकर्षक नाही. iv) मलपृष्ठ बोधप्रद नाही. v) रंगसंगतीस वाव असून योग्य रंगांचा उपयोग नाही. (पानांचा–फुलांचा एकच रंग)

७) पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगाविषयी निष्कर्ष :

i) वयोगटानुसार भाषिक स्तर न्यूनतम.

ii) पाठात व्याकरण भागाचा परिचय, स्पष्टीकरण कमी.

iii) शब्दसंग्रह, शब्दार्थ पर्याप्त नाहीत.

iv) अभ्यासपूरक उपक्रम कार्यान्वित करण्यास पुरेसा वाव नाही.

२) सुश्री मीराभट (१९९७–९८), पुणे

विषय :

"हिंदी बालभारती पहली कक्षा (१९९७ – प्रथम स्तर) ९क्षेत्रोंसे संबंधित क्षमताओ की दृष्टीसे पाठ्यपुस्तक का समीक्षणात्मक अध्ययन".

हिंदी बालभारतीच्या इ.१लीच्या पाठ्यपुस्तकाचे ९ क्षेत्रांशी संबंधित क्षमतांनुसार समीक्षा करणे.

उद्दिष्टे :

१) मातृभाषा हिंदीची उद्दिष्टे समोर ठेवून पाठ्यपुस्तकातील घटकांचा समावेश आहे का ते पाहणे.

२) आशयानुसार पाठांची समीक्षा करणे, शिफारशी सुचविणे.

३) पाठामंध्ये समाविष्ट चित्रे योग्य आहेत का हे पाहून सुधारणा करण्याच्या हेतुने शिफारशी करणे.

४) S.C.E.R.T. ने निर्देशित केलेली तत्वे समोर ठेवून इ.१लीच्या हिंदी पाठ्यपुस्तकाची निर्मिती केली आहे का, याचा शोध घेणे.

निष्कर्ष :

१) पाठ्यपुस्तकात अभ्यासक्रमाच्या तत्वांचा विचार झालेला दिसून येतो.

२) पाठ्यक्रमातील अपेक्षित मूल्यशिक्षणाची प्रभावीरित्या परिपूर्णता झालेली आहे.

३) पाठ्यक्रमानुसार अध्ययन अनुभवांची संख्या कमी आहे. परंतु शिक्षकांनी असे अध्ययन—अनुभव द्यावेत असे अपेक्षित आहे.

**इतर संशोधन :**

३) चौधरी यु.एस.(१९७६), कोल्हापूर

यांनी राष्ट्रीयकृत क्रमिक पुस्तकातील मूल्ये, गरजा, विषयांश या दृष्टीकोनातून मूल्यमापन केले. त्यांना प्रस्तुत संशोधनातून असे आढळले की, क्रमिक पुस्तकातील प्रश्नांची मांडणी खालच्या दर्जाची आहे.

४) शेख आय.सी.(१९९८), कोल्हापूर

यांनी इ.७वीच्या हिंदी पाठ्यपुस्तकांचे पाठ्यपुस्तक तंत्रज्ञानानुसार परीक्षण केले. त्यांना प्रस्तुत संशोधनातून असे आढळून आले की, पाठ्यपुस्तक तंत्रज्ञानाच्या सर्व घटकानुसार पुस्तक योग्य आहे.

**इंग्रजी पाठ्यपुस्तकांशी संबंधित संशोधने :**

१) अलका विकास दलाल (२००३—०४), पुणे

विषय :

'१९९८ च्या अभ्यासक्रमानुसार तयार करण्यात आलेल्या इ.८वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकाचे संशोधनात्मक समीक्षण'.

उद्दिष्टे :

१) पाठ्यपुस्तकाचे अंतरंग व बहिरंगाचा अभ्यास करणे.

२) पाठ्यपुस्तकातील अंतर्भूत गाभाघटकांचा अभ्यास करणे.

३) पाठ्यपुस्तकातील उपक्रम व त्यांची पूर्तता याबद्दल माहिती मिळविणे.

४) प्रस्तुत पाठ्यक्रमाव्दारे इंग्रजी अध्यापनाची उद्दिष्टे कितपत साध्य होतात, याचा पडताळा घेणे.

निष्कर्ष :

१) ७६% शहरी व ७२.५% ग्रामीण शिक्षकांच्या मते इंग्रजीचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यास तासिका अपुऱ्या पडतात.

२) ५२% शहरी व ५५% ग्रामीण शिक्षक विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयातील प्रगतीबद्दल असमाधानी आहेत.

३) शिक्षक व विद्यार्थी यांनी कथा रूपातील गद्यपाठांना सर्वाधिक पसंती दिली आहे.

४) बहुसंख्य विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील मोठी संभाषणे व उपक्रम हे भाग आकलनास कठीण वाटतात. तर कथा व छोटी संभाषणे सर्वात सोपी वाटतात.

५) फार कमी विद्यार्थी पुस्तकातील उपक्रम पूर्ण करतात.

६) सर्व कविता रंजक वाटतात.

२) श्री महम्मद हशम रियाजुद्दीन पटेल (१९९२), कोल्हापूर

विषय :

'इ.८वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकाचे पाठ्यपुस्तक तंत्रज्ञानानुसार अभ्यास करणे.

उद्दिष्टे :

१) इ.८वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकाच्या बहिरंगाचा अभ्यास करणे.

२) इ.८वीच्या इंग्रजीच्या पुस्तकातील मुद्रणतंत्राचा अभ्यास करणे.

३) इ.८वीच्या इंग्रजीच्या पुस्तकातील तंत्रज्ञानाच्या गणितीय प्रक्रियेचा अभ्यास करणे.

निष्कर्ष :

१) इ.८वीच्या पाठ्यपुस्तकाचा आकार व पृष्ठसंख्या योग्य आहे.

२) पाठ्यपुस्तकासाठी वापरलेल्या कागदाचा दर्जा उत्कृष्ठ, उच्च व टिकाऊ स्वरूपाचा आहे.

३) मुखपृष्ठ पुस्तकाचा भार पेलू शकेल इतपत जड आहे. परंतु फारसे आकर्षक नाही.

४) शीर्षक योग्य आहे. मुखपृष्ठात सुधारणा हवी.

इतर संशाधने :

३) नायर, के.एस्. (१९७६) :

यांनी केरळ राज्यातील १९५२ पासून तयार केलेल्या क्रमिक पुस्तकांचे विश्लेषण करून पाठ्यपुस्तकांच्या दर्जाचा अभ्यास केला.

उद्दिष्टे :

१) इंग्रजीतील क्रमिक पुस्तकांचे विश्लेषण करणे.

२) इंग्रजी पाठ्यपुस्तकातील दर्जाचा शोध घेणे.

निष्कर्ष :

१) इंग्रजी पाठ्यपुस्तकांचा दर्जा इयत्तेनुसार बदलतो.

४) सिंग एम्.ए. (१९८४) :

यांनी हरियाणाच्या ६वी, १०वीच्या वर्गासाठी असलेल्या राष्ट्रीय क्रमिक पाठ्यपुस्तकांच्या गुणदोषांचे विश्लेषण केले. त्यांच्या भौतिक बाबींचे विश्लेषण व मूल्यमापन केले.

निष्कर्ष :

१) इंग्रजी क्रमिक पुस्तकातील गद्यपाठ कमी विनोदी असून अध्ययन कर्त्याच्या दृष्टीने काही पाठ अवघड होते.

२) कविता अवघड व लांबलचक होत्या.

इतर विषयांशी निगडीत संशोधने :

१) सौ.शुभांगी प्रभाकर हेरवाडे (२००६), कोल्हापूर

शीर्षक : निम्नस्तरावरील सन १९९५च्या अभ्यासक्रमानुसार तयार केलेली इतिहास विषयाची पाठ्यपुस्तके सन २००६च्या पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार तयार केलेली इतिहास विषयाची पाठ्यपुस्तके यांचा तुलनात्मक अभ्यास.

— य.च.म.मु.विद्यापीठाच्या एम.एड. पदवीसाठी सादर केलला प्रबंध

उद्‌दिष्टे :

१) सन १९९५च्या अभ्यासक्रमानुसार महाराष्ट्र म.रा. पाठ्यपुस्तक निर्मितीव संशोधन मंडळाने तयार केलेल्या इतिहास विषयाच्या पुस्तकाचे विश्लेषण करणे.

२) सन २००६च्या अभ्यासक्रमानसुार महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळाने तयार केलेल्या इतिहास विषयाच्या पुस्तकांचे विश्लेषण करणे.

३) सन १९९५ आणि २००६च्या अभ्यासक्रमानुसार महाराष्ट्र राज्यात म.रा. पा.नि.व.सं. मंडळाने तयार केलेल्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

४) संशोधनाच्या निष्कर्षाच्या आधारे पाठ्यपुस्तक निर्मितीबाबत सकारात्मक शिफारशी करणे.

निष्कर्ष :

१) १९९५ चा इतिहास विषयाच्या अभ्यासक्रम हा कौशल्याधिष्ठित आहे. तर २००६ च्या अभ्यासक्रम सुध्दा कौशल्याधिष्ठित स्वरूपात आहे.

२) २००६च्या अभ्यासक्रमात आधुनिकता या तंत्राचा वापर केला आहे.

३) १९९५च्या अभ्यासक्रमांच्या उद्दिष्टांपेक्षा २००६ च्या अभ्यासक्रमाची उद्दिष्टे जास्त विस्तृत व सविस्तर आहेत.

४) २००६च्या अभ्यासक्रमात आंतरराष्ट्रीय सामंजस्याची जाणिव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केलेली दिसते.

५) १९९५च्या अभ्यासक्रमापेक्षा २००६च्या अभ्यासक्रमाचा इतर विषयाशी समवाय साधण्याचा प्रयत्न झालेला दिसतो.

६) १९९५ व २००६ या दोन्हीही अभ्यासक्रमातून मिळविलेल्या ज्ञानाचे व्यवहारात उपयोजन दिसून येत नाही.

७) इ.३रीच्या १९९५ व २००६ चा अभ्यासक्रम बदलेला आहे. पण इ. ३रीचे इतिहास पाठ्यपुस्तक बदलेले नाही.

८) पाठ्यपुस्तकातील घटक क्रमबद्धप्रमाणे मांडलेले आहेत.

९) पाठ्यपुस्तकाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ यामध्ये बदल होणे आवश्यक आहे.

१०) सर्व गाभाभूत घटक व मूल्ये यांचे प्रतिबिंब पाठ्यपुस्तकात पडलेले नाही.

११) विविध क्षमतांचा विचार पाठ्यपुस्तकामध्ये केलेला नाही.

२) वाघमारे एस.जी.

शीर्षक : 'महाराष्ट्र राज्यामधील इ.४थी साठी असलेल्या इतिहास पाठ्यपुस्तकातील स्वाध्यायांचा अभ्यास'.

— महाराष्ट्र राज्य शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद १९७१

(MSBT PCR प्रस्तुत)

उद्‌दिष्टे :

१) इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातील स्वाध्यायातून पाठ्यपुस्तकांची उद्‌दिष्टपूर्ती कितपत होते हे पाहणे.

२) विविध प्रकारच्या स्वाध्यायांना दिलेल्या गुणभारांशाची पडताळणी करणे.

३) इतिहास विषयाचया विविध उद्‌दिष्टांना अनुसरून नवीन स्वाध्यायसंच तयार करणे.

४) नवीन स्वाध्याय संचाच्या योग्यतेचे मूल्यमापन करणे.

निष्कर्ष :

१) इ.४थी च्या इतिहास पाठ्यपुस्तकातील ९५ घटकांपैकी ३९ घटक 'ज्ञान' या उद्‌दिष्टावर आधारीत आहेत. तर ५५ घटक आकलनावर आधारीत आहेत. तर फक्त एकच घटक व्यक्तिमत्व विकासावर आधारीत असून उपयोजन आणि कौशल्यावर आधारीत एकही घटक नाही.

२) ९५ घटकांपैकी १४ घटकांवर वस्तुनिष्ठ प्रकारचे, ६१ घटकांवर लघुत्तरी प्रकारचे, १९ घटकांवर दीर्घोत्तरी प्रकारचे आणि एक घटक नाट्यीकरणावर आधारीत असून कृतीयुक्त उपक्रमासंबंधीचा एकही प्रश्न नाही.

३) पाठ्यपुस्तकातील एकूण ९५ घटकांपैकी २४ घटकांवरील प्रश्नचुकीचे आहेत तर त्यातील १७ घटकांमध्ये सुधारण करणे शक्य होते. तर राहिलेले ७ प्रश्न काढून टाकावे लागले.

३) करिम पी.आय.ए.

शीर्षक : राष्ट्रीय एकात्मता हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केरळमधील शाळांमधून नमूने व साधने विकसित करण्याच्या दृष्टीने इतिहास पाठ्यपुस्तकांच्या पाठ्यांशांचे विश्लेषण करणे.

निष्कर्ष : केरळमधील इ.८वी, ९वी, १०वी च्या इतिहास पाठ्यपुस्तकातून राष्ट्रीय एकात्मता या मूल्याचा किती प्रमाणात समावेश आहे, या हेतूने हा अभ्यास केला गेला. ह्या पाठ्यपुस्तकांचे विश्लेषण करताना साम्यवाद आणि प्रादेशिकवाद यांचा अभ्यासक्रमात अडथळा निर्माण होतो का हे पाहिले गेले. अडथळे जरी दुर्मिळ असले तरी राष्ट्रीय एकात्मेच्या खास हेतुने हा अभ्यासक्रम रचलेला नाही.

४) बोरगे बी.एम.(एम.ए.एम.ए.ड)

विषय : माध्यमिक शाळेतील इतिहास अध्ययन–अध्यापनातील पाठ्यपुस्तके आणि मार्गदर्शकांच्या उपयोगाचा चिकित्सक अभ्यास.

संशोधनाची उद्दिष्टे :

१) विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्या दृष्टीकोनातून पाठ्यपुस्तक व मार्गदर्शकांच्या अध्ययन–अध्यापनातील चिकित्सक अभ्यास करणे.

२) पाठ्यपुस्तकांपेक्षा मार्गदर्शक अधिक उपयुक्त होण्याचा महत्वाच्या घटकांचा शोध घेणे.

३) पाठ्यपुस्तकांच्या स्वरूपाबाबत दुसरा पोषक पर्याय सुचविणे.

४) इतिहास अभ्यासक्रमाचे पृथ:करण निर्धारीत तासिका याबाबतची माहिती जाणून घेणे.

निष्कर्ष :

१) इतिहास अध्यापकांचा अनुभव इ.१०वीला इतिहास शिकविणारे शिक्षक हे प्रदीर्घ अनुभवी असल्यामुळे प्रश्नावलीला प्रतिसाद देताना त्यांनी व्यक्त केलेली मते विश्वसनीय व ग्राह्य मानावयास पाहिजेत.

२) इतिहास पाठ्यपुस्तकांचा स्तर विद्यार्थ्यांचे वय, त्यांच्या गरजा, आकलन शक्ती यांचा विचार करता योग्य आहे.

३) पाठ्यपुस्तकाचे महत्व शिक्षकांबरोबर पालकांनाही आहे. पाल्याने अभ्यास करावा असा आग्रह धरणाऱ्या पालकांची संख्या फक्त २०: एवढीच आहे. ही एक चिंतेची बाब आहे.

IV अभ्यासक्रमाशी संबंधित संशोधने :

१) शोभा कागदे (२००२), पुणे

विषय : N.C.E.R.T. ने इ.स.२००० साली प्रसिध्द केलेल्या शालेय शिक्षणाच्या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यातील मूल्यशिक्षणाच्या प्रस्तावित तरतुदींचा आणि महाराष्ट्र राज्यातील प्रचलित प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यक्रमातील मूल्यशिक्षविषयक तरतुदींचा तौलनिक अभ्यास करणे आणि शिफारशी सुचविणे.

उद्दिष्टे :

१) N.C.E.R.T. ने इ.स.२००० साली प्रसिध्द केलेल्या शालेय शिक्षणाच्या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यातील मूल्यशिक्षणविषयक तरतुदींची पुढील घटकांनुसार माहिती संकलित करणे—

i) आशय ii) उपयोगिता iii) अध्यापन पध्दती iv) मूल्यमापन पध्दती

२) महाराष्ट्र राज्यातील प्रचलित प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमातील मूल्यशिक्षणविषयक तरतुदींची पुढील घटकांनुसार माहिती संकलित करणे –

i) आशय ii) उपयोगिता iii) अध्यापन पध्दती iv) मूल्यमापन पध्दती

३) वरील उद्‌दिष्ट क्र.१ आणि उद्‌दिष्ट क्र.२ यातील मूल्यशिक्षणविषयक तरतुदींची तुलना करणे.

४) प्रचलित मूल्यशिक्षणविषयक तरतुदी व त्यांची कार्यवाही यामध्ये आढळणाऱ्या त्रुटी दूर करण्यासाठी शिफारशी सुचविणे.

निष्कर्ष :

१) प्रचलित अभ्यासक्रमात मूल्यशिक्षणाची व्याप्ती वाढवण्यात आली आहे.

२) स्वयंअध्ययनावर विशेष भर देण्यात आला आहे.

३) मूल्यशिक्षण अध्यापन अधिक समाजभिमुख व्हावे.

## २) रामदास बरकले (१९८६), पुणे

विषय : विसाव्या शतकाच्या आरंभापासून महाराष्ट्र राज्यातील इतिहास अभ्यासक्रमाचा चिकित्सक अभ्यास

उद्‌दिष्टे :

१) २० व्या शतकाच्या आरंभापासून महाराष्ट्र राज्यातील इ.३रीच्या अभ्यासक्रमाच्या विकासाचा चिकित्सक अभ्यास करणे.

२) महाराष्ट्रातील इ.३रीच्या सध्याचा अभ्यासक्रम व भारतातील काही प्रातिनिधिक राज्यातील इतिहासाचा अभ्यासक्रम यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३) महाराष्ट्रातील माध्यमिक शाळांसाठी इ.३री चा नमुना अभ्यासक्रम तयार करणे.

निष्कर्ष :

१) स्वातंत्र्योत्तर काळात अभ्यासक्रम देताना मूल्यमापनाच्या परिभाषेत अभ्यासक्रम अधिक तपशीलात देण्याची पध्दती सुरू झाली व अभ्यासक्रम अधिकाधिक स्पष्ट होऊ लागला.

२) १९८२ चा महाराष्ट्रातील इतिहासाचा अभ्यासक्रम इतर राज्यातील अभ्यासक्रमांच्या तुलनेने वैशिष्ट्यपूर्ण व इतिहासाच्या आधुनिक संकल्पनेवर तयार केलेला आढळतो. मर्यादित कालखंड व सखोल आशय हे तंत्र दरवरच्या इयत्तेत नियुक्त आशयाचे बाबतीत पाळलेले दिसते. इतर राज्यांच्या अभ्यासक्रमात तसा प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही.

३) इतिहासाच्या अभ्यासक्रमाच्या आतापर्यंतच्या वाटचालीत अध्ययन अनुभवांचा विचार जरी खूप पुढे गेला असला तरी आचार मात्र खूपच मागे आहे.

## ३) सरोज मनोहर देशमुख, पुणे

विषय : इतिहास (इ.३ ते इ.५) जुन्या मालेतील पाठ्यपुस्तके व नवीन मालेतील पाठ्यपुस्तके यांचा तुलनात्मक अभ्यास.

उद्‌दिष्टे :

१) १९६८ च्या अभ्यासक्रम आणि १९८८चा पुनर्रचित अभ्यासक्रम यानुसार लिहिलेल्या इ.३, ४ व ५ वीची इतिहासाची पाठ्यपुस्तके यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

२) नव्या मालेतील पाठ्यपुस्तकांत आवश्यक असल्यास सुधारणा सुचविणे.

३) नव्या मालेतील पाठ्यपुस्तके अध्ययन–अध्यापनदृष्ट्या अधिक उपयुक्त होण्यासाठी शिफारशी करणे.



15597

निष्कर्ष :

१) नव्या अभ्यासक्रमातील उद्दिष्टे जुन्या अभ्यासक्रमातील उद्दिष्टांपेक्षा अधिक योग्य आहेत.

२) नव्या अभ्यासक्रमातील उद्दिष्टे अधिक स्पष्ट आहेत.

३) नवा अभ्यासक्रम जुन्यापेक्षा सोपा आहे, असे ग्रामीण विभागातील शिक्षकांना वाटते.

४) अध्यापनासाठी नव्या अभ्यासक्रमाची तयारी जास्त करणे आवश्यक आहे.

५) नव्या अभ्यासक्रमातील तासिकांची विभागणी बरीच सोयीची वाटते.

४) सौ.प्रणोती पां.चौगुले (२००८), कोल्हापूर

विषय :

महाराष्ट्र राज्याच्या १९९५ व २००६ प्राथमिक स्तरावरील शारिरिक शिक्षण अभ्यासक्रमांचा तुलनात्मक अभ्यास.

उद्दिष्टे :

१) महाराष्ट्र राज्याच्या १९९५ च्या प्राथमिक स्तरावरील शारिरिक शिक्षण अभ्यासक्रमाचे आशय विश्लेषण करणे.

२) महाराष्ट्र राज्याच्या २००६ च्या प्राथमिक स्तरावरील शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाचे आशय विश्लेषण करणे.

३) महाराष्ट्र राज्याच्या १९९५ व २००६ च्या प्राथमिक स्तरावरील शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांची तुलना करणे.

४) १९९५ व २००६ च्या प्राथमिक स्तरावरील शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांविषयी तज्ञांचा व शिक्षकांच्या मतांचा अभ्यास करणे.

निष्कर्ष :

१) शारीरिक शिक्षण विषयाच्या अभ्यासक्रमांची व्याप्ती पाहता विषयासाठी दिलेल्या तासिका योग्य आहेत.

२) शैक्षणिकस्तरानुसार निम्नस्तराला जास्त व उच्च स्तराला कमी तासिका असे १९९५ च्या शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमातील तासिकांचे वाटप योग्य आहे.

३) १९९५च्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा व सामाजिक गरजांचा विचार केलेला आहे.

४) १९९५ चा शारीरिक शिक्षण अभ्यासक्रम विद्यार्थी केंद्रित आहे.

५) १९९५ चा शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमात मूल्यमापन संदर्भात मार्गदर्शन अपुरे वाटते.

६) १९९५ व २००६ च्या दोन्ही शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांच्या ध्येयातून बालकाच्या भविष्यकाळाचा विचार केलेला आहे.

७) २००६च्या अभ्यासक्रमातून संस्कृती व मूल्यांची जोपासना होते.

८) २००६चा शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमात क्रमबध्दतेचा विचार केला आहे.

९) सन १९९५ व २००६ या दोन्ही अभ्यासकेंद्रातील घटकांमधून साध्य होणाऱ्या क्षमता योग्य आहेत.

समारोप :

प्रस्तुत प्रकरणात संशोधिकेने संबंधित साहित्याचा व संशोधनांचा आढावा घेतला आहे. संबंधित संशोधनांच्या अभ्यासामुळे संशोधिकेला संशोधनाच्या उदिदष्टांच्या संदर्भात कोणती पद्धती वापरावी, संशोधनाची कोणती साधणे कशी निवडावी, नमुनानिवड कशी करावी तसेच निष्कर्ष कसे काढावेत याची कल्पना आली.

पुढील प्रकरण तीनमध्ये संशोधन व कार्यपध्दती बद्दल सविस्तर चर्चा केली आहे.